# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भूममध्ये प्रतिबंधित गुटखा जप्त; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१० एप्रिल -**

भूम पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत साईनाथ गोळी सेंटर येथे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे.

दि. ९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे २.१० वाजता आरोपी अभिजीत हिरालाल रोकडे (वय ३५, रा. शिवशंकर नगर, भूम) यांच्या साईनाथ गोळी सेंटर या दुकानात छापा टाकण्यात आला.



यावेळी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला रजनिगंधा मसाला, बाबा पान मसाला, आरएमडी पान मसाला, केआर १००० गुटखा, विमल पान मसाला, व्ही-१ टोबॅको, प्रीमियम शॉट सुगंधीत तंबाखू, सेंटेड टोबॅको, रत्ना छाप तंबाखू, बाबा १२० सुगंधीत तंबाखू आदी साहित्य विक्रीसाठी साठवून ठेवलेले आढळून आले.

या कारवाईत एकूण १९,३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### यमगरवाडी येथे आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर

**तुळजापूर, दि.१० एप्रिल -**

तुळजापूर येथील एकलव्य विद्या संकुल, यमगरवाडी येथे विद्यार्थिनी व महिलांसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. इयत्ता सहावी ते नववीतील सुमारे १०० विद्यार्थिनी, महिला कर्मचारी व परिसरातील महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय खुणे, डॉ. नितीन भोसले, डॉ. प्रसाद धर्म, डॉ. अभय शहापूरकर व डॉ. वहिदास शेख प्रमुख उपस्थित होते. डॉ. प्रसाद धर्म यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत आरोग्य व शिक्षण यांचा संबंध स्पष्ट केला. सूत्रसंचालन प्रणिता शेटकार यांनी केले, तर आभार प्रदर्शन निर्मला हुग्गे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### डोकेवाडीच्या पांडुरंग आहेर यांना पीएच.डी. पदवी

**भूम, दि.१० एप्रिल -**



भूम तालुक्यातील डोकेवाडी येथील पांडुरंग लक्ष्मण आहेर यांनी सार्वजनिक वितरण प्रणालीचा प्रशासकीय अभ्यास आणि ग्राहक समाधानावर तिचा परिणाम या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली. ही पदवी वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत मिळाली असून त्यांच्या संशोधनाला डॉ. भरत राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. आहेर यांचे प्राथमिक शिक्षण डोकेवाडी येथे, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण बार्शी येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात झाले. पुढील शिक्षण पुण्यात पूर्ण करून त्यांनी संशोधनाद्वारे ही यशस्वी कामगिरी केली असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.



### भाऊसाहेब खरसडे यांचा परंड्यात सत्कार

**परंडा, दि.१० एप्रिल -**

बानगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते भाऊसाहेब खरसडे यांची धाराशिव जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी निवड झाल्याबद्दल परंडा शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तालुकाध्यक्ष ॲड. संदीप खोसे पाटील, न.प. सभापती राहुल बनसोडे, श्रीहरी नाईकवाडी, नसीर शहावर्फीवाले, नंदू शिंदे, घनश्याम शिंदे व बाशा भाई आदी उपस्थित होते.

# नशामुक्त भारत संकल्प, संस्कारमय पिढी घडवणार : डॉ. कृष्णगोपाल

**कुटुंब प्रबोधन, संस्कार, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्य, पर्यावरण - पंचसूत्रीतुन समाज परिवर्तनावर भर...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

कुटुंब प्रबोधन, संस्कार, सामाजिक समरसता, नागरी कर्तव्य, पर्यावरण संरक्षण व राष्ट्रभक्ती यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा भर असुन या पंचसूत्रीतुन समाज परिवर्तन करण्यावर भर आहे. भौतिक प्रगती सोबत अध्यात्मिक भाव वाढणे गरजेचे आहे. नशामुक्त भारत संकल्प असुन संस्कारमय पिढी घडवण्याची सर्वांची जबाबदारी आहे त्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन संघांचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सामाजिक जीवनातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी प्रमुख नागरिक संगोष्ठी (परिसंवाद) कार्यक्रम संपन्न झाला, यात डॉ कृष्णगोपाल यांनी संवाद साधत मार्गदर्शन केले. व्यासपीठावर जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम, लातुर संघचालक संजय अग्रवाल उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्यवाह अजय जानराव यांनी केले. ॲड.सचिन सुर्यवंशी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. यशवंत सुर्यवंशी यांनी व्यक्तीक गीत सादर केले. सुत्रसंचलन विश्वास कांबळे यांनी केले. आभार प्रदर्शन ॲड. मल्लिकार्जुन आपचे यांनी मानले. कृष्णगोपाल हे मथुरा येथील रहिवासी असुन प्राथमिक ते उच्च स्तर संघ शिक्षण वर्ग केले आहे. १९६५ पासुन ते स्वयंसेवक आहेत, १९८० पासुन ते प्रचारक असुन २०१२ पासुन सह सरकार्यवाह ही जबाबदारी पार पाडत आहेत. संघाच्या ९० हजार शाखा रोज होत असुन ४० हजार साप्ताहिक व मासिक शाखा अश्या १ लाख ३० हजार ठिकाणी संघ स्वयंसेवक एकत्र येतात व मातृभूमीची प्रार्थना करतात. संघांचे कार्य गेली १०० वर्षापासुन निरंतर चालत असुन ते दिवसेंदिवस वाढत आहे. हिंदू समाजाने संघ कार्य समजुन घेतले पाहिजे, हे कार्य सर्वांचे आहे. हेडगेवार यांनी लढा दिला त्यांनी सुरु केलेले कार्य देशव्यापी बनले आहे.



३ हजार वर्षापुर्वी भारत जागतिक मोठे आर्थिक केंद्र होते, इथून अनेक वस्तु निर्यात केल्या जायच्या. तक्षशिला, नालंदा यासह अनेक ठिकाणी विश्वविद्यालय चालवले जायचे, तिथे १० हजार विद्यार्थी एका वेळेस शिक्षण घ्यायचे. अनेक महान राजे जग जिंकणारे इथे होते. अंकगणित, बीज गणित यासह नक्षत्र व अंतराळ, वैदिक, व्याकरण भाषा, कपडे, परिमाण व्यवस्था, कृषी व तंत्रज्ञान हे भारताने जगाला दिले. अध्यात्मत श्रेष्ट असताना भारतात अत्याचार झाले. देशात जातीय, आर्थिक, भाषा, वर्ण विभाजन झाल्याने परकीय आक्रमण झाले. कर्मकांड व रूढीमध्ये आपण अडकुन राहिलो. हेडगेवार यांनी देशात शाखा सुरु केल्या, मणिपूर, आसाम, लेह लड्डाख, जैसलमेर, अंदमान निकोबार अश्या अनेक ठिकाणी आता शाखा सुरु आहेत.

स्वयंसेवक संघाच्या विविध ४० संघटना सेवा कार्य करीत आहेत. रुग्णालय, शिक्षण सारख्या विविध क्षेत्रात मोफत सेवा संघ देत आहे. दुध, कृषी उत्पन्नत देश पुढे असुन प्रगती करीत आहे. संविधान कसे बनले त्यासाठी काय कष्ट प्रयत्न झाले हे माहिती करून घेतले पाहिजे. धर्म चक्र हे निरंतर सुरु राहणार आहे. देशात चांगले नागरिक बनविणे हे सांगजाचे ध्येय आहे. अनेक जण मतदान करीत नाहीत, जे करतात त्यातील काही प्रलोभनातून करतात. सगळा समाज आपला आहे असे म्हण्टले पाहीजे, सामाजिक समरसता असली पाहिजे. स्वतंत्रता, बंधुत्व व समानता हे तिन्ही गोष्टी असल्या पाहिजेत, हे डॉ. आंबेडकर यांनी संविधान सभेत सांगितले. समाजासाठी काही करावे लागेल. जगाला अध्यात्म देण्याचे काम करायचे आहे. संघाच्या या अभियानात सर्वांनी सहभागी होऊन योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. जो राष्ट्रभक्ती करतो, परंपरा पाळतो तो हिंदू आहे मग तो मुस्लिमसह इतर कोणत्याही धर्माचा असो त्याला आम्ही हिंदू मानतो असे ते म्हणाले.

अजय जानराव यांनी संघ स्थापना, इतिहास, संघ कार्याची माहिती दिली. व्यापक गृहसंपर्क अभियान अंतर्गत स्वयंसेवक यांनी संघांचे कार्य पोहचवत पत्रक दिली, धाराशिव जिल्ह्यात ६५० स्वयंसेवक यांनी २७० गावात जाऊन ३५ हजार घरात संपर्क व संवाद साधला. हिंदू संमेलन अंतर्गत गाव, वस्ती स्तरावर कार्यक्रम घेण्यात आले. धाराशिव जिल्ह्यात १५ संमेलन झाले असुन आणखी ३५ ठिकाणी संमेलन होणार असल्याचे सांगितले.

### महत्वाचे मुद्दे...

* नशामुक्त भारताचा संकल्प - तरुण पिढीत वाढती व्यसनाधीनता रोखण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा., * संस्कारमय पिढी घडवणे-कुटुंब आणि समाजाची सामूहिक जबाबदारी., * भौतिक + आध्यात्मिक प्रगती आवश्यक-विकासासोबत मूल्यांची जपणूक महत्त्वाची., * सामाजिक समरसतेवर भर-जात, भाषा, आर्थिक भेद विसरून एकात्मता आवश्यक., * पर्यावरण संवर्धनाचे आवाहन-वृक्षारोपण, प्लास्टिक बंदी, इंधनाचा मर्यादित वापर., * चांगला नागरिक घडवणे हेच अंतिम ध्येय., * मतदान, कर्तव्य आणि जबाबदारी याकडे दुर्लक्ष नको., * देशाच्या विकासाबरोबर कुटुंब व समाजही मजबूत हवा.

## पाथरुड येथे १४ लाखांची व्यायामशाळा मंजूर



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१० एप्रिल -**

तालुक्यातील पाथरुड येथे नवीन बंदिस्त व्यायामशाळा (जिम) उभारण्यासाठी १४ लाख रुपयांची मंजुरी मिळाली असून गावातील युवक, खेळाडू व पैलवानांसाठी ही मोठी आनंदाची बातमी ठरली आहे.

जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजारी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा मंदाळकर व जिल्हा क्रीडाधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ. चेतन बोराडे यांना या कामाच्या मंजुरीचे पत्र प्रदान करण्यात आले. गावातील युवकांकडून व्यायामशाळेची मागणी वारंवार करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन ग्राम पंचायतीमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जिल्हा क्रीडा विभागाने प्रस्ताव मंजुरीसाठी पुढे पाठविला.

या व्यायामशाळेला खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रयत्नातून शिफारस मिळाल्याने मंजुरी मिळाली. तसेच आमदार कैलास पाटील, युवा नेते गजेंद्र जाधव, ग्राम अधिकारी महादेव गिरी व संबंधित अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

## एसटीच्या ‘स्वच्छता कर’वरून प्रवाशांत नाराजी; कोट्यवधींचा निधी कुठे खर्च?




**परवेज मुल्ला**
**कळंब, दि.१० एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी)ने प्रवाशांच्या तिकिटावर आकारलेला दोन रुपयांचा स्वच्छता कर हा सर्वसामान्यांच्या खिशावर टाकलेला अतिरिक्त आर्थिक भार असल्याची तीव्र नाराजी राज्यभरातून व्यक्त होत आहे.

राज्यात दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक तिकिटामागे दोन रुपये आकारल्यास महामंडळाच्या तिजोरीत दररोज सुमारे १ कोटी १० लाख रुपये, महिन्याला ३३ कोटी रुपये, तर वर्षाला तब्बल ४०१ कोटी ५० लाख रुपये जमा होणार असल्याचा अंदाज आहे.

इतक्या मोठ्या निधीची वसुली होत असतानाही राज्यातील अनेक बसस्थानके व बसेस आजही स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे चित्र आहे. राज्यात २५१ आगार आणि ५९८ बसस्थानके असून या ठिकाणी स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे व बसची नियमित साफसफाई यासाठी निधीचा प्रभावी वापर करण्याची मागणी जोर धरत आहे. महामंडळाने अलीकडेच सहलींच्या माध्यमातून १२७ कोटी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले असून २५ हजार ५५८ बस फेऱ्या पार पडल्या. गतवर्षीच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाख रुपयांची वाढ झाली असतानाही प्रवाशांना अपेक्षित सुविधा मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे.

प्रवाशांचे म्हणणे आहे की, अनेक बस वाटेतच बंद पडतात, स्वच्छतेचा अभाव जाणवतो, तसेच बसस्थानकांची परिस्थितीही समाधानकारक नाही. त्यामुळे स्वच्छता करातून मिळणारा निधी नेमका कुठे खर्च होतो, याबाबत पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, १५ एप्रिल ते १५ जून या गर्दीच्या उन्हाळी हंगामात महामंडळाने १० टक्के भाडेवाढ जाहीर केल्याने प्रवाशांना आणखी एक धक्का बसला आहे. वाढत्या महागाईमुळे आधीच त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांना एसटी प्रवास अधिक महाग होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### ‘लालपरी’ सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर?


एकेकाळी गोरगरिबांची लालपरी म्हणून ओळखली जाणारी एसटी सेवा आता हळूहळू सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची चर्चा आहे. इलेक्ट्रॉनिक बस सेवांचा विस्तार झाला असला तरी त्यांचे तिकीटदर सर्वांना परवडणारे नसल्याने लालपरी आता श्रीमंतांचीच होत चालली का? असा सवाल प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

## गोमांसाची अवैध वाहतूक; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

आनंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंशीय जनावरांच्या मांसाची अवैध वाहतूक उघडकीस आली आहे.

दि.९ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र. एमएच २५ एजे ५५३५) या वाहनातून अंदाजे ६०० किलो संशयित गोमांस



विक्रीच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याची घटना समोर आली. या मांसाची किंमत सुमारे १ लाख ८ हजार रुपये असून वाहनासह एकूण ४ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, वाहन पंक्चर झाल्याने अज्ञात चालकाने ते घटनास्थळीच सोडून पळ काढला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहन व मांस ताब्यात घेतले. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### वाहतुक शाखेकडून २.६१ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी ९ एप्रिल रोजी प्रमुख रस्त्यांवर विशेष मोहीम राबवत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली. या मोहिमेत एकूण ३०८ कारवाया करण्यात आल्या असून २ लाख ६१ हजार ८०० रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला.

### येरमाळा येथे मोटरसायकल चोरी

**येरमाळा, दि.१० एप्रिल -** येरमाळा परिसरातील आमराई येथून अज्ञात चोरट्याने सुमारे ३० हजार रुपये किमतीची होंडा योगा (एमएच ४४ पी ५९३५) मोटरसायकल चोरी केल्याची घटना घडली. ही घटना ७ एप्रिल रोजी घडली असून, याप्रकरणी रामचंद्र विश्वनाथ जाधवर (रा. रत्नापूर, ता. कळंब) यांनी तक्रार दिली आहे. येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## जार पाण्याबाबत सावधान! उन्हाळ्यात दूषित पाण्याचा धोका

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० एप्रिल -**

प्रचंड उन्हाळ्यामुळे थंड पाण्याची मागणी वाढली असून शहरासह ग्रामीण भागात जार पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र, केवळ थंड असल्यामुळे जार पाणी वापरणे धोकादायक ठरू शकते, अशी आरोग्य तज्ज्ञांची सूचना आहे.



अनेक ठिकाणी पाणी शुद्धीकरण प्रक्रिया (RO/UV) योग्य पद्धतीने होत आहे का, याबाबत शंका व्यक्त होत आहे. काही विक्रेते साध्या फिल्टरद्वारे किंवा जुन्या जारमध्ये पाणी भरून विक्री करत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे हे पाणी पूर्णपणे सुरक्षित आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

तज्ज्ञांच्या मते, दूषित किंवा अपूर्णपणे शुद्ध केलेले पाणी पिण्यामुळे पोटाचे विकार, जुलाब, टायफॉइड तसेच काविळीसारखे आजार होऊ शकतात. विशेषतः उन्हाळ्यात अशा आजारांचा धोका अधिक वाढतो. ग्राहकांनी पुढील बाबींचा काळजी घ्यावी. फक्त नोंदणीकृत व विश्वासार्ह पुरवठादारांकडूनच जार पाणी घ्यावे, जारवरील सील, उत्पादन तारीख व ब्रँड तपासावा, जार स्वच्छ आहे का, आत घाण किंवा कण दिसत नाहीत याची खात्री करावी. दरम्यान, प्रशासनाने जार पाणी विक्रेत्यांवर नियमित तपासणी मोहीम राबवून निकृष्ट दर्जाचे पाणी विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

उन्हाळ्यात शरीरासाठी पाणी अत्यावश्यक असले तरी ते सुरक्षित व शुद्ध असणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे थंड आहे एवढ्यावर न थांबता शुद्ध आहे का? हे तपासणे आता गरजेचे ठरत आहे.

# ‘जनसमर्थ’ पोर्टलमुळे पीक कर्ज प्रक्रिया सुलभ

### शेतकऱ्यांना घरबसल्या अर्जाची सुविधा...

**महावीर जालन**
**भूम, दि.१० एप्रिल -**

केंद्र सरकारच्या जनसमर्थ पोर्टल द्वारे पीक कर्ज प्रक्रिया आता अधिक सुलभ व पारदर्शक करण्यात आली असून शेतकऱ्यांना घरबसल्या ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.




पूर्वी बँकेत चकरा मारणे किंवा तासनतास रांगेत उभे राहण्याची गरज भासत होती. मात्र आता राष्ट्रीयीकृत बँकांकडून ही सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जासोबत कागदपत्रांची पडताळणीही ऑनलाइन पद्धतीने होत असल्याने मध्यस्थ किंवा दलालांची गरज उरलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होत आहे.

ज्या शेतकऱ्यांना इंटरनेट वापरण्यात अडचण आहे, ते ‘आपले सरकार’ सेवा केंद्र, ग्राम पंचायत कार्यालय किंवा इतर ऑनलाइन केंद्रांच्या माध्यमातूनही या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. या तंत्रज्ञानामुळे पीक कर्ज वाटपातील अडथळे दूर होऊन शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळण्यास मदत होणार आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांकडून शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्पदरात पीक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या सुविधेमुळे बियाणे, खते व मशागतीसाठी वेळेवर कर्जपुरवठा मिळतो.

सुमारे १ लाख ६० हजार रुपयांपर्यंतचे पीक कर्ज उपलब्ध होत असून, पूर्ण प्रक्रिया संगणकीकृत झाल्याने पारदर्शकता वाढली आहे.

#### किसान क्रेडिट कार्डची सुविधा...

पीक कर्ज घेणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड दिले जाते. या कार्डाच्या मदतीने गरजेनुसार पैसे काढता येतात.

#### शेतकऱ्यांसाठी सोयीचे...

जनसमर्थ' पोर्टलवर विविध बँकांच्या कर्ज योजना उपलब्ध असून शेतकरी मोबाईल किंवा लॅपटॉपवरून थेट अर्ज करू शकतात.

#### फार्मर आयडी अनिवार्य...

ऑनलाइन अर्जासाठी शेतकऱ्याकडे केंद्र किंवा राज्य सरकारचा अधिकृत ‘फार्मर आयडी’ असणे आवश्यक आहे.

मागील आर्थिक वर्षात मी जनसमर्थ पोर्टलवरून बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत पीक कर्जासाठी अर्ज केला होता. मला केवळ २० मिनिटांत कर्ज मिळाले.

**- अजय नलावडे,** शेतकरी, लांजेश्वर

शेतकऱ्यांनी ‘जनसमर्थ’ पोर्टलच्या माध्यमातून नवीन आर्थिक वर्षात पीक कर्जासाठी ऑनलाइन अर्ज करावा. त्यामुळे कमी वेळात कर्ज मिळणे शक्य होत आहे.

**- अजय चौहान,** शाखा व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, ईट